**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०७६ दिनांक २४/०९/२०१९**

## हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर

## हडपसर पोलीसांनी बीडमध्ये दिवसाढवळया शिक्षकाचा खुन करणा-या आरोपीस पकडले.

दिनांक १९/०९/२०१९ रोजी दुपारी सैनिकी विदयालय बीडचे सह शिक्षक सय्यद साजिद अली यांचा पुर्ववैमन्यासातुन निर्घृण हत्या केल्याने बीड पोलीस स्टेशन येथे खुनाचा गुन्हा दाखल झाला होता. मा. रघुनाथ जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक सोा हडपसर पोलीस स्टेशन पुणे यांनी तपास पथकातील अधिकारी सपोनि चव्हाण व तपास पथकातील कर्मचारी यांना बीड येथील सैनिकी विदयालय येथे घडलेल्या खुनाच्या गुन्हयाचे तपासाबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार तपास पथकातील अधिकारी स.पो.नि. संजय चव्हाण, तपास पथकातील कर्मचारी असे हडपसर परिसरात वरील गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असताना पो.शि. नितीन मुंढे व पो. शि. शाहिद शेख यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, बीड येथील सैनिकी विदयालया चे सह शिक्षक सय्यद साजिद अली यांचा खुन करणाऱ्या इसमां पैकी अमर अकबर शेख हा सय्यद नगर हडपसर पुणे या परिसरात राहण्यास आहे. तो काही वेळात रेल्वेगटजवळ येणार असुन त्याचे डाव्या पायाला घोटयाजवळ जखम झालेली आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाली. सदर बातमीनुसार तपासपथकातील पोलीस अधिकारी व पोलीस स्टाफ असे बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा लावुन इसम नामे अमर अकबर शेख वय ३० वर्षे रा. बालेपीर ता. जि. बीड सध्या राहणारा गल्ली नं.१२ सय्यद नगर हडपसर पुणे याला पकडून त्यास वरील स्टाफच्या मदतीने हडपसर पोलीस स्टेशन येथे आणुन त्यास बीड पोलीस स्टेशनकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या ताब्यात पुढील चौकशीकामी देण्यात आले आहे.

इसम नामे अमर अकबर शेख वय ३० वर्षे रा. बालेपीर ता. जि. बीड हा बीड पोलीसांच्या शरीराविरुध्दाचा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचेवर बीड जिल्हामध्ये वेगेवेगळया पोलीस स्टेशनला एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत. तसेच तो अन्वर ऊर्फ गुजर खान या टोळीचा सदस्य आहे. वरील खुनाचे पडसाद मोठया प्रमाणावर बीड शहरावर उमटलेले असुन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनलेला होता.

सदरची कामगिरी मा. सुनील फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे, मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त , परिमंडळ ५ पुणे शहर व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली मा. रघुनाथ जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, हडपसर पोलीस ठाणे पुणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक श्री. संजय चव्हाण, सहा.पो.फौजदार युसुफ पठाण, पो.हवा. राजेश नवले, पो.ना. प्रताप गायकवाड, पो.ना. सैदोबा भोजराव, पो.ना. विनोद शिवले, पो.ना. गणेश दळवी, पो. शि. नितीन मुंढे, पो.शि. अकबर शेख, पो. शि. शाहीद शेख, पो.शि. अमित कांबळे, पो.शि. विजय पवार यांनी केलेली आहे.